**नि.क्र.०१ वर आदेश** १ संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक **६४७/२०१७**
सार्थक जाधव वि. मोरया कन्स्ट्रक्ट + ३

**<u>फिर्याद निशाणी क्रमांक ०१ वर फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०२(१) अन्वये आदेश</u>**
(दिनांक **१३.०७.२०१८** रोजी पारीत)

**०१.** फिर्यादपत्रक, फिर्यादीची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०० ची तपासणी व सोबतची कागदपत्रे विचारात घेतली. फिर्यादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एम्. एन्. शिंदे यांचा युक्तीवाद ऐकला.

**०२.** फिर्यादीने बदनामीबाबत फिर्याद केली आहे. फिर्यादपत्रकात नमुद घटना व्हॉटस् ॲप संदेशाद्वारे घडल्याचे दिसते. आरोपीविरुद्ध पुढील कार्यवाही करण्यास पुरेसे कारण आहे किंवा नाही हे ठरवण्यासाठी पोलीसांकरवी चौकशी होणे आवश्यक आहे. म्हणून पोलीसांकरवी चौकशी करणे अपेक्षीत आहे. म्हणून आदेशीका काढण्याचे लांबणीवर टाकून पोलीसांमार्फत चौकशी करण्याचा आदेश पारीत करणे न्यायाचे होईल.

**<u>आ दे श</u>**

**(अ)** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०२(१) अन्वये आदेशीका काढण्याचे लांबणीवर टाकून प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे, नागोठणे यांना जातीने अथवा प्रकरणपरत्वे सक्षम पोलीस अधिका-याची नेमणूक करुन अन्वेषण करुन चौकशी अहवाल दिनांक **१०.०८.२०१८** रोजी अथवा तत्पुर्वी दाखल करण्याचा आदेश देण्यात येतो.

(आ) उपरोक्त आदेश त्वरीत प्रभारी अधिकारी, पोलीस ठाणे, नागोठणे यांना अवगत करावा.

**---स्वाक्षरी---**

**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, रोहा.**
**जिल्हा रायगड.**

**स्थळ : रोहा.**
**दिनांक : १३.०७.२०१८.**